Telephone No. - 020-26123066/67 Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in

प्रसिध्दीपत्रक
परीक्षा प्राधान्य

क्र.मरापप/आरआयएमसी/जून -2019/ 197
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-1
दिनांक : 09/01/2019.

प्रति,

मा. महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
(तळमजला), मंत्रालय,
मुंबई- 400 032.

विषय:- राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून प्रवेश पात्रता परीक्षा
दिनांक 1 व 2 जून 2019.

महोदय,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या **"राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून (उत्तरांचल) प्रवेश पात्रता परीक्षा"** दि. दिनांक 1 व 2 जून 2019 च्या संदर्भातील (इंग्रजी व मराठी) प्रसिध्दीस द्यावयाच्या निवेदनाची प्रत सोबत जोडली आहे.

कृपया सोबतचे प्रसिध्दिपत्रकास राज्यातील सर्व प्रमुख वर्तमानपत्रातून तसेच आकाशवाणी व दूरदर्शनवरुन **15 जानेवारी 2019** पर्यंत विनामूल्य प्रसिध्दी देण्यात यावी ही विनंती.

आपला विश्वासू,

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -१

सोबत:- प्रसिध्दिपत्रक

E:\amol\RIMC EXAM 1 & 2 DEC. 2018 LETTERS\RIMC Exam press note.doc Dec. 2018.doc

## प्रसिध्दिपत्रक

## राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून (RIMC)

## प्रवेश पात्रता परीक्षा दि.1 व 2 जून 2019 रोजी पात्रता परीक्षा

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी "राष्ट्रीय भारतीय सैन्य महाविद्यालय, डेहराडून (उत्तरांचल) येथे इ. 8वी साठी प्रवेश पात्रता परीक्षा" **दिनांक 1 व 2 जून 2019** रोजी पुणे येथे घेण्यात येणार आहे. **ही परीक्षा फक्त मुलांसाठीच आहे.**

या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांचे वय **दि. 1 जानेवारी 2020** रोजी **11½** (अकरा वर्ष सहा महिने) पेक्षा कमी **13** (तेरा)वर्षापेक्षा अधिक नाही असे विद्यार्थी सदर परीक्षेस पात्र समजण्यात येतील. म्हणजेच जन्म **दि. 2 जानेवारी 2007** ते **दि. 1 जुलै 2008** या कालावधीत असावा. विद्यार्थी **दिनांक 1 जानेवारी 2020** ला कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेमध्ये इ. 7 वी या वर्गात शिकत असावा किंवा 7 वी उत्तीर्ण असावा.

परीक्षेसाठी कमांडंट, राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून, उत्तरांचल 248003 यांचेकडून विहीत नमुन्यातीलच आवेदनपत्रे घ्यावयाची आहेत. विद्यार्थ्यांनी अनुसुचित जाती/जमातीसाठी **रु. 555/- (जातीच्या दाखल्याच्या सत्यप्रतीसह) आणि जनरल संवर्गातील विद्यार्थ्यांनी रु. 600/- चा डिमांड ड्राफ्ट** देणे आवश्यक आहे. सदर ड्राफ्ट फक्त **स्टेट बँक ऑफ इंडिया** या बँकेचाच **"कमांडंट, आर. आय. एम. सी., डेहराडून", यांचे नावे काढावा, ड्राफ्टवर पेअेबल अँट डेहराडून** (तेलभवन बँक **Code No. 01576**) अशी नोंद करावी. आवेदनपत्र, माहितीपत्र व मागील 5 वर्षाचे प्रश्नपत्रिका संच ड्राफ्ट पाठविल्यानंतर **कमांडंट, राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून, उत्तरांचल 248003** यांचेकडून पोस्टाने पाठविण्यात येतील. परिपूर्ण भरलेली आवेदनपत्रे **दि. 31 मार्च , 2019 पर्यंत आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, 17 डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे- 411001** यांचेकडे पोहचतील अशा प्रकारे स्पीड पोस्टाने पाठवावीत किंवा समक्ष जावून जमा करावीत. **त्यानंतर आलेली आवेदनपत्रे कोणत्याही परिस्थितीत स्विकारण्यात येणार नाहीत.** आवेदनपत्र दोन-प्रतीत भरणे आवश्यक आहे व त्यासोबत जन्मतारखेच्या दाखल्याची प्रत, जातीच्या दाखल्याची (अनुसुचित जाती/जमातीसाठी) छायांकित एक प्रत, अधिवासी दाखल्याची सत्यप्रत (Domicile Certificate) जोडणे आवश्यक आहे. तसेच शाळेचे बोनाफाईड सर्टिफिकेटची मुळ प्रत जोडणे आवश्यक आहे.

परीक्षेसाठी इंग्रजी, गणित, आणि सामान्यज्ञान या तीन विषयांचे लेखी पेपर असतील. परीक्षार्थीना गणिताचा व सामान्यज्ञानाचा पेपर इंग्रजी अथवा हिंदीमध्ये लिहिता येईल. गणित व सामान्यज्ञान विषयांच्या प्रश्नपत्रिका इंग्रजी / हिंदी या भाषेत उपलब्ध होतील. **लेखी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती शुक्रवार दि. 04 ऑक्टोबर 2019 रोजी घेण्यात येतील.**

**अधिक माहितीसाठी 020-26123066/67 या क्रमांकावर संपर्क करा.**

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -१

# PRESS NOTE

## RASHTRIYA INDIAN MILITARY COLLEGE
## (R.I.M.C.) DEHRADUN ENTRANCE EXAMINATION
## $1^{ST}$ & $2^{ND}$ JUNE, 2019.

The RIMC Examination for admission to Class VIII in the "Rashtriya Indian Military College, Dehradun" for the Jan 2020 term will be held at pune for Maharashtra on **01 (Sat.) and 02 (Sun.) jun 2019.**

**Only boys are eligible to apply for admission to the RIMC, Deharadun.** The candidate should either be studying in class VII or passed class VII From any recognized school at the time of admission to the RIMC, i.e on **1 Jan 2020** They should not be less than 11 ½ years in age but should not have attained the age of 13 years as on **01 Jan 2020** (i.e they should not be born earlier then **02 Jan 2007** and not later than **01 July 2008.**)

The Prospectus - cum application form and booklet of old papers can be obtained from The Rashtriya Indian Military College, Garhi Cantt, Dehradun, Uttarakhand Pin-248003 through the speed post by forwarding self addressd slip and on account payee bank demand draft of Rs. 600/- for general candidates, Rs. 555/- for SC/ST candidates alongwith Cast Certificate, The demand draft will be made in favour of **'The Commandant RIMC Deharadhun'** drawee branch, State Bank of India, Tel Bhavan, Dehradun (Bank code- 01576) Uttarakhand.

Application in duplicate on prescribed form accompanied by documents to be attached with application form two passport size photographs, Domicile certificate of candidate, Birth certificate, SC/ST certificate and certificate from principal of the school in original with photograph on it attested stating date of birth and in which class studying.

The application form should reach to 'Commissioner, Maharashtra State Council of Examination', 17 Dr. Ambedkar Road, Pune - 411001, by **31 March 2019.**

**(Tukaram Supe)**
**Commissioner**
**Maharashtra State Council of**
**Examinations, Pune-1**

E:\umol\RIMC EXAM 1 & 2 DEC. 2018 LETTERS\RIMC Exam press note.doc Dec. 2018.doc

# माहितीपत्रक

## राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून (RIMC)

### प्रवेश पात्रता परीक्षा दि.1 व 2 जून 2019 रोजी पात्रता परीक्षा

राष्ट्रीय भारतीय सैन्य महाविद्यालय, डेहराडून (उत्तरांचल) प्रवेश पात्रता परीक्षा **दिनांक 1 व 2 जून 2019** रोजी **पुणे** येथे घेण्यात येणार आहे. ही परीक्षा फक्त मुलांसाठीच आहे.

या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांचे वय **1 जानेवारी 2020** रोजी **11½** (अकरा वर्ष सहा महिने) पेक्षा कमी **13 वर्षापेक्षा अधिक नाही असे विद्यार्थी सदर परीक्षेस पात्र समजण्यात येतील. म्हणजेच जन्म दि. 2 जानेवारी 2007 ते 1 जुलै 2008** या कालावधीत असावा. विद्यार्थी दिनांक **1 जानेवारी 2020** ला कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेमध्ये इ. 7 वी या वर्गात शिकत असावा किंवा 7 वी उत्तीर्ण असावा.

परीक्षेसाठी कमांडंट, राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून, उत्तरांचल 248003 यांचेकडून विहीत नमुन्यातीलच आवेदनपत्रे घ्यावयाची आहेत. विद्यार्थ्यांनी **अनूसुचित जाती/जमातीसाठी रु. 555/- (जातीच्या दाखल्याच्या सत्यप्रतीसह) आणि जनरल संवर्गातील विद्यार्थ्यांनी रु. 600/- चा डिमांड ड्राफ्ट** देणे आवश्यक आहे. सदर ड्राफ्ट फक्त **स्टेट बँक ऑफ इंडिया** या बँकेचाच **"कमांडंट, आर. आय. एम. सी., डेहराडून", यांचे नावे काढावा, ड्राफ्टवर पेऐबल ॲट डेहराडून (तेलभवन बँक Code No. 01576)** अशी नोंद करावी. आवेदनपत्र, माहितीपत्र व मागील 5 वर्षाचे प्रश्नपत्रिका संच ड्राफ्ट पाठविल्यानंतर **कमांडंट, राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून, उत्तरांचल 248003** यांचेकडून पोस्टाने पाठविण्यात येतील. परिपूर्ण भरलेली आवेदनपत्रे **31 मार्च 2019** पर्यंत **आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, 17 डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे-411001** यांचेकडे पोस्टाने पोहचतील अशा प्रकारे पाठवावीत किंवा समक्ष सदर कार्यालयामध्ये जमा करावी. **त्यानंतर आलेली आवेदनपत्रे कोणत्याही परिस्थितीत स्विकारण्यात येणार नाहीत.** आवेदनपत्र दोन-प्रतीत भरणे आवश्यक आहे व त्यासोबत जन्मतारखेच्या,जातीच्या दाखल्याची (अनूसुचित जाती/जमातीसाठी) छायांकित एक प्रत, अधिवासी दाखल्याची सत्यप्रत (Domicile Certificate) जोडणे आवश्यक आहे. तसेच शाळेचे बोनाफाईड सर्टिफिकेटची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे.

परीक्षेसाठी इंग्रजी, गणित, आणि सामान्यज्ञान या तीन विषयाचे लेखी पेपर असतील. परीक्षार्थींना गणिताचा व सामान्यज्ञानाचा पेपर इंग्रजी अथवा हिंदी मध्ये लिहिता येईल. गणित व सामन्यज्ञान विषयांच्या प्रश्नपत्रिका इंग्रजी व हिंदी या भाषेत उपलब्ध होतील. **लेखी परीक्षेतून निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती 04 ऑक्टोबर , 2019 रोजी घेण्यात येतील.**

### आवेदनपत्र भरण्यासाठीच्या सूचना

1) आवेदनपत्र दोन प्रतीत भरणे आवश्यक आहे.
2) विद्यार्थ्यांच्या चार फोटो पैकी 2 फोटो आवेदनपत्रावर चिटकवून त्या फोटो खाली विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी व दुसरे 2 फोटोंच्या पाटीमागे विद्यार्थ्याने स्वाक्षरी करावी.
3) शाळेच्या बोनाफाईड सर्टिफिकेटची मूळप्रत पाठवावी. त्यावर विद्यार्थ्याचा फोटो असावा.
4) नगरपालिका/ग्रामपंचायत/पंचायत समितीच्या विहीत नमुन्यातील, विद्यार्थ्याच्या जन्मतारखेच्या दाखल्याची एक साक्षांकित झेरॉक्स प्रत सादर करावी.
5) अधिवासाच्या दाखल्याची (Domicile Certificate) प्रत मुख्याध्यापकांमार्फत किंवा राजपत्रित अधिकाऱ्यांमार्फत साक्षांकित (Attested) करुन सादर करावी.
6) सर्व बाबी पुर्ण न केल्यास आवेदनपत्र अपूर्ण समजण्यात येईल. असे आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही.
7) दि. 20 मे 2019 पर्यंत प्रवेशपत्र प्राप्त न झाल्यास या कार्यालयाशी दुरध्वनीवरुन संपर्क साधावा.
8) विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे www.mscepune.in या परिषदेच्या संकेतस्थळावरुनही डाऊनलोड करता येतील.

# राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून प्रवेशासाठी दि.1 व 2 जून 2019 रोजी पात्रता परीक्षा

## वेळापत्रक

| दिनांक | वार | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| 01/06/2019 | शनिवार | स.10.00 ते 12.00 | इंग्रजी | 125 |
| 01/06/2019 | शनिवार | दु. 2.00 ते 3.30 | गणित | 200 |
| 02/06/2019 | रविवार | स. 10.00 ते 11.00 | सामान्यज्ञान | 75 |

परीक्षेसाठी इंग्रजी, गणित, आणि सामान्यज्ञान या तीन विषयाचे लेखी पेपर असतील. परीक्षार्थींना गणिताचा व सामान्यज्ञानाचा पेपर इंग्रजी अथवा हिंदीमध्ये लिहिता येईल. गणित व सामन्यज्ञान विषयांच्या प्रश्नपत्रिका इंग्रजी / हिंदी या भाषेत उपलब्ध होतील.

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -१